महत्त्वाचे

राज्य कर निरीक्षकपदी सौरभ नरवडे



अहिल्यानगर (प्रतिनिधी)– महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत वस्तू व सेवा कर (जीएसटी) विभागातील वर्ग दोनच्या राज्य कर निरीक्षक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत टाकळी खातगाव (ता. नगर) येथील सौरभ एकनाथ नरवडे उत्तीर्ण झाले आहेत. राज्यात ८८ वा क्रमांक मिळवून हे यश संपादन केले आहे. यापूर्वी पोलिस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेतही यश मिळविले होते. नरवडे यांचे प्राथमिक शिक्षण प्राथमिक शाळा तर माध्यमिक शिक्षण हनुमान विद्यालय खातगाव येथे झाले. त्यानंतर मॅकेनिक इंजिनिअर ही पदवी घेतल्यानंतर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला. यापूर्वी पोलिस उपनिरीक्षकपदाची परीक्षेत यश मिळविले होते. सौरभ हा एकनाथ नरवडे यांचे मुलगा तर लष्करातील सेवानिवृत्त अधिकारी दत्तात्रय नरवडे यांचे पुतणे असून प्राथमिक शिक्षक नेते बजरंग बांदल यांचे भाचे आहेत.

उपजिल्हाधिकारीपदी कवित्के

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– जिल्हा निवडणूक उपजिल्हाधिकारीपदी दत्तात्रय कवित्के, तर जिल्हा पुनर्वसन अधिकारीपदी वर्षा पवार यांची नियुक्ती झाली आहे. गेल्या चार महिन्यांपासून ही पदे रिक्त होती. जिल्हा निवडणूक उपजिल्हाधिकारी राहुल पाटील यांची पदोन्नतीवर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळात अतिरिक्त जिल्हाधिकारी या पदावर एप्रिल महिन्यात पदोन्नती झाली. तेव्हापासून हे पद रिक्त होते. जिल्हा पुनर्वसन अधिकारी शाहूराज मोरे यांची यशवंतराव चव्हाण प्रशासकीय अकादमीमध्ये बदली झाली आहे. रोजगार हमी योजनेचे उपजिल्हाधिकारी अनुपसिंह यादव यांच्याकडेच दोन्ही विभागांचा अतिरिक्त पदभार होता.

आयुर्वेद जनजागृतीसाठी रॅली

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– आयुर्वेद जनजागृतीसाठी नगरच्या गुणे आयुर्वेद महाविद्यालयातील प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी शनिवारी जनजागृती रॅली काढली. आयुर्वेदाच्या प्रचार व प्रसारासाठी या रॅलीत सहभागी विद्यार्थ्यांनी हातात जनजागृतीचे फलक व विविध आयुर्वेदीक औषधांचे झाडे घेतली होती. येत्या २३ सप्टेंबरला साजरा होणाऱ्या १० व्या राष्ट्रीय आयुर्वेद दिनानिमित्त आयुर्वेदाच्या जनजागृतीसाठी ही रॅली काढण्यात आली. गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय लोडे यांनी रॅलीचे उद्घाटन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ.सुरज ठाकूर, माजी प्राचार्य डॉ.संगीता देशमुख आदींसह प्राध्यापक व सर्व विद्यार्थी या रॅलीत सहभागी झाले होते. प्राचार्य डॉ.दत्तात्रय लोडे म्हणाले, भारत सरकारच्या आयुष मंत्रालय, आयुर्वेद विद्यापीठ नाशिक व गंगाधर गुणे आयुर्वेद महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय आयुर्वेद दिनाच्या दशपूर्ती वर्षानिमित्ताने महाविद्यालयात विविध उपक्रम, विविध स्पर्धा व प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यानिमित्ताने रॅली काढून नागरिकांमध्ये आयुर्वेदाची जनजागृती केली आहे.

श्रमिक संघटनेच्या अध्यक्षपदी आमले

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– जेऊर येथील आशा आमले यांची श्रमिक कल्याण कामगार संघटना महिला जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तानाजी शिंदे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या वेळी भिल्ल असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील ठाकरे, राम शिंदे, अविनाश लाहोर, भरत धुरपते, किशोर भिंगारे, श्रीकांत सुरम आदी उपस्थित होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष शिंदे म्हणाले, संघटनेमध्ये महिलांचा सहभाग हा नेहमीच महत्त्वाचा राहिला आहे. आमले यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील महिला कामगार चळवळीला बळकटी येईल, असा विश्वास आहे. यावेळी आमले म्हणाले, माझ्यावर संघटनेने दाखविलेला विश्वासाला तडा न जाऊ देता मी या पदाच्या माध्यमातून महिलांच्या समस्या, त्यांचे हक्क व कल्याण यासाठी कटिबद्ध राहीन. कामगार बांधवांच्या अडचणी सोडविण्यासाठी आणि संघटनेचे बळ वाढविण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करेन. समाजहिताच्या कार्याला नेहमीच प्राधान्य देऊन संघटनेच्या कार्यात महिलांचा सक्रिय सहभाग वाढविण्याचा संकल्प असणार असल्याची भावना व्यक्त केली.

इस्रो सहलीसाठी श्रेयश घालमेची निवड

कर्जत (प्रतिनिधी) – येथील भारती पब्लिक स्कूलचा इयत्ता पाचवीचा विद्यार्थी श्रेयश घालमे याची इस्रो सहलीसाठी निवड झाली आहे. श्रेयशने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला.

या सहलीसाठी विद्यार्थी आज (दि. २१) पुण्याहून रेल्वेने बेंगळुरूला रवाना होणार आहेत. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना विधान भवन, लालबाग बॉटनिकल गार्डन, इस्कॉन मंदिर, बेंगळुरू पॅलेस अशा ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. दि. २३ सप्टेंबर रोजी विद्यार्थी इस्रो सेंटरला भेट देऊन उपग्रह नियंत्रण व अवकाश संशोधनाची महत्त्वपूर्ण माहिती प्रत्यक्ष जाणून घेतील. सहलीचा समारोप दि. २४ रोजी विमानाने पुण्यात परत येऊन होईल. या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष नामदेव राऊत, स्पर्धा परीक्षा प्रमुख स्मिता वाघुले यांनी श्रेयशचे अभिनंदन केले.

पारनेरमध्ये साकारणार एक कोटींचे नमो उद्यान : आ. दाते

पारनेर (तालुका प्रतिनिधी) – शहरातील नागरिकांसाठी लवकरच एक कोटी रुपयांच्या निधीतून नमो उद्यान साकारणार असल्याची माहिती पारनेर नगर विधानसभा मतदार संघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी दिली. आ. दाते यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून नगर विकास खात्याचे मंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील एकूण ३९४ नगरपरिषद आणि नगरपंचायतींमध्ये नमो उद्यान वर्षभरात विकसित करण्यात येणार असल्याचे सांगताना जनभावनेचा आदर राखून केलेल्या मागणीस्तव पारनेर नगरपंचायतचाही त्यात समावेश केल्याने तालुक्याचे ठिकाण असलेल्या पारनेर शहराच्या वैभवात अधिकची भर पडणार असून तालुक्यातील जनतेसाठी ही जमेची बाजू आहे. नव्याने विकसित झालेल्या या उद्यानांची विभागीय स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. त्या माध्यमातून प्रत्येक विभागातून ३ नगरपरिषद, नगरपंचायतींना बक्षिसे देखील देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आलेला असून नमो उद्यानांच्या स्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे पारितोषिक संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रथम पाच कोटी, द्वितीय तीन कोटी तर तृतीय क्रमांकासाठी एक कोटी रुपये अशी बक्षिसाची रक्कम विजेत्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींना देण्यात येणार असल्याचे सांगत सबंधित स्पर्धेच्या दृष्टीकोनातून पारनेर नगरपंचायत प्रशासनामार्फत निश्चितपणे गतिमान पाऊले उचलली जातील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मोहटा गडावर नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी

न्यायाधीश महेश लोणे यांच्या हस्ते उद्या होणार घटस्थापना

▸ भाविकांची गर्दी पाहता पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस बंदोबस्तात मोहटादेवी भक्तनिवास पासून रस्त्याच्या बाजूला असलेले अतिक्रमणे शनिवारी दुपारी काढायला सुरुवात करण्यात आली. मोहटादेवी गडावरील रस्त्याचे रुंदीकरण झाले असून सध्या सिमेंट काँक्रिटीकरण, रस्ता खडीकरण व मुरमीकरणाने काही ठिकाणी काम करण्यात आले आहे.

पाथर्डी (तालुका प्रतिनिधी) – शारदीय नवरात्र महोत्सवाची श्री क्षेत्र मोहटादेवी देवस्थान येथे तयारी पूर्ण झाली असून भाविकांच्या स्वागतासाठी देवस्थान सज्ज झाले आहे. उद्या सोमवारी (२२ सप्टेंबर) रोजी जिल्हा न्यायाधीश तथा देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश लोणे यांच्या हस्ते घटस्थापना होऊन उत्सवाला प्रारंभ होईल.

पाथर्डी शहरापासून सुमारे दहा किलोमीटर अंतरावर उंच डोंगरावर मोहटादेवीचे स्वंयभू स्थान आहे. हे मंदिर देशातील देवी मंदिरांपैकी असून मंदिराची रचना श्री यंत्रकार यांनी केली आहे. या ठिकाणी अश्वीन शुद्ध प्रतिप्रदोषापासून कोजागिरी पौर्णिमेपर्यंत पूजा चालते. या काळात दैनंदिन होमहवन, सप्तशती पाठ, जागर, गोंधळ, भजन, हरिपाठ आदी धार्मिक विधीसोबतच राज्यातील नामवंतांचे कीर्तन होणार आहे. राष्ट्रसंत आचार्य गोविंददेव गिरिजी महाराज यांची श्रीमद् देवीभागवत कथा २६ ते २८ ऑक्टोबर दरम्यान होणार असून १ ऑक्टोबर रोजी तारकेश्वर गडाचे आदिनाथ महाराज शास्त्री यांचे काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. अष्टमी होमहवन ३० सप्टेंबर रोजी प्रधान जिल्हा न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते होईल. दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी सिमोल्लंघन सोहळा आणि शस्त्रपूजन होईल. ३ ऑक्टोबर, अश्विन शुद्ध एकादशीला मोहटादेवीची यात्रा असून गावात दिवसभर पालखी दर्शन, रात्री उत्सव मूर्तीची पालखी मिरवणूक निघून मध्यरात्रीनंतर गडावर शोभेची दारू उडविण्यात येणार आहे.

४ ऑक्टोबरला सकाळी कलाकारांच्या हजेऱ्या आणि दुपारी कुस्तीचा हगामा होऊन उत्सवाची सांगता होणार आहे. ६ ऑक्टोबरला कोजागिरी पौर्णिमेला रात्री महाआरती व दुग्धप्रसादाने नवरात्रोत्सवाची सांगता होईल. नवरात्र काळात कुमारिका पूजन, सुवासिनीची ओटी भरणे, दृष्ट काढणे, कुंकुमार्चन पूजा आदी विधी वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने साजरे होतात. घट बसविण्यासाठी राज्याच्या विविध भागातून हजार महिला मंदिराच्या पारायण व महाप्रसाद हॉलमध्ये दाखल होत आहेत. सुसज्ज भक्तनिवास, अहोरात्र मोफत महाप्रसाद, विशेष अतिथी निवास आणि भव्य वाहनतळाची सुविधा आहे. मुख्य दर्शन मार्गामध्ये अष्टभैरव, चौसष्टयोगिनी, दशमहाविद्या मंदिरे आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात अशी मंदिरे कोठेही नाहीत. नवरात्रीच्या प्रत्येक दिवसाची आराध्यदेवी येथे असून अनेक भाविक त्या देवीपुढे विशिष्ट विधी करतात; त्रिकाळ आरतीसाठी भाविकांची गर्दी असते. ऐंशी ते शंभर किलोमीटर परिसरातून भाविक पायी चालत दर्शनासाठी येतात. नगर-पाथर्डी रस्ता पायी चालणाऱ्या भाविकांच्या गर्दीने फुलून जातो. संपूर्ण मार्गावर चहा-पाणी, फराळ, महाप्रसाद, औषधोपचार मोफत दिले जातात. झालेल्या पावसामुळे देवी गडसह परिसरात सर्वत्र निसर्ग बहरला आहे. देवस्थान समितीच्या गाड्यांसह राज्य परिवहन महामंडळाच्या बीड, नगर, औरंगाबाद, पुणे विभागातून जास्त गाड्या सुरू झाल्या आहेत. सुसज्ज दर्शनरांग व भव्य गाभाऱ्यामुळे भाविकांना दर्शन सुलभतेने होणार आहे. देवस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश महेश लोणे यांच्या मार्गदर्शनाखाली देवस्थान समितीचे विश्वस्त पाथर्डीचे दिवाणी न्यायाधीश रविकिरण सपाटे, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, प्र. गटविकास अधिकारी संगीता पालवे, शशिकांत दहिफळे, बाळासाहेब दहिफळे, विठ्ठल कुटे, अक्षय गोसावी, श्रीराम परतानी, ॲड. कल्याण बडे, डॉ. श्रीधर देशमुख, ॲड. विक्रम वाडेकर आदी यात्रेच्या नियोजनावर लक्ष ठेवून आहेत. तालुक्यातील धामणगाव देवी, दगडवाडी, तोंडोळी, वडगाव, तिसगाव, खांडगाव, रेणुकाईवाडी, कोल्हार आदी स्थानांसह पाथर्डी शहरातील सर्व देवीमंदिरे आकर्षक विद्युत रोषणाईने सजली आहेत.

आघाडीचा निर्णय स्थानिक पातळीवर घ्या

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचा आदेश

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – आघाडी करून लढायचं की स्व बळावर त्याचा निर्णय तुम्ही स्थानिक पातळीवर घ्या. आघाडी करून लढणार असाल तर विधानसभे सारखा मनपा निवडणुकीत जागा वाटपाबाबत शेवटपर्यंत विषय घोळत ठेऊ नका. ज्या जागा शिवसेनेच्या हक्काच्या आहेत, त्यावर शिवसैनिकांना लढण्याची संधी द्या. कोणत्याही परिस्थितीत नगर मनपावर शिवसेनेचा भगवा फडकवा, असा स्पष्ट आदेश शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिला आहे.

आगामी मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगर शहर ब्लॉक काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष मनोज गुंदेचा, अल्पसंख्यांक काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष अनिस चुडीवाल, महिला काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष उषाताई भगत, महिला काँग्रेस शहर जिल्हा उपाध्यक्ष शैलाताई लांडे, काँग्रेस ग्रंथालय विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष सुनील आप्पा लांडगे, वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष प्रतीक बारसे, युवा नेते नीलेश लांडे आदींनी ठाकरे शिवसेनेत प्रवेश केला. ठाकरेंनी त्यांना शिवबंधन बांधले. या प्रवेशा वेळी प्रवक्ते खा. संजय राऊत, सचिव खा. विनायक राऊत, शहराध्यक्ष किरण काळे यांच्यासह शिवसेनेचे नेते उपस्थित होते. महानगरपालिकेचा भ्रष्टाचार उघड केला म्हणून किरण काळे यांना सत्ताधाऱ्यांनी तुरुंगात डांबलं. खा. राऊत यांना देखील तुरुंगात टाकलं होतं. सातत्याने शिवसेनेवर हे हल्ले होत आहेत. मात्र, शिवसैनिकांनी डगमगू नयेत, असे आवाहन यावेळी ठाकरे यांनी केले. मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे गटात गेलेले अनेकजण पुन्हा ठाकरे गटात येण्यासाठी प्रयत्नशील असल्याचा दावा यावेळी काळे यांनी केला.

स्वस्थ नारी सशक्त अभियान अंतर्गत बूथ हॉस्पिटलमध्ये शिबिर

मनपाकडून महिलांची आरोग्य तपासणी व मार्गदर्शन

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या निर्देशानुसार राज्य शासनाच्या आरोग्य विभाग व महानगरपालिकेच्या वतीने अहिल्यानगर शहरात स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत ११ आरोग्य केंद्रांवर महिलांसाठी विविध आरोग्य तपासणी शिबिर, जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मागील दोन दिवसात जिजामाता आरोग्य केंद्र व बूथ हॉस्पिटलमध्ये महानगरपालिकेच्या वतीने आरोग्य शिबिर घेऊन महिलांच्या तपासण्या करण्यात आल्या.

आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून या शिबिर व उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. शिबिरात महिलांसाठी रक्तदाब, मधुमेह, नेत्र, दंत रोग तपासणी, स्तन व गर्भाशय मुख व मुख कर्करोग तपासणी, गरोदर महिलांसाठी प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण सेवा, रक्त व हिमोग्लोबिन तपासणी, क्षयरोग तपासणी, सिकसेल आजार व रक्तक्षय तपासणी आदी तपासण्या करून विशेष तज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, गरोदर आणि स्तनदा मातांसाठी तसेच लहान बाळांसाठी योग्य आहार, मासिक पाळी स्वच्छता व पोषण, टेक-होम राशनचे वितरण आदी उपक्रम राबविण्यात आले. अभियानात माता व बालसुरक्षा (एमसीपी) कार्ड, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना नोंदणी, आयुष्मान वय वंदना कार्ड, सिकल सेल कार्ड, पोषण ट्रॅकरमध्ये लाभार्थी नोंदणी आदी सुविधा येथे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. नागरिकांनी या अभियानात सहभाग घेऊन लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक डांगे यांनी केले आहे.

पाण्याच्या प्रवाहात वाहून गेलेल्या तरुणाचा मृत्यू

भाळवणी (वार्ताहर) – पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील केटीवेअरमध्ये वाहून गेलेल्या तरुणाचा मृतदेह सापडला. ही घटना शुक्रवारी(दि.२०) सकाळी घडली. सुरेश सिध्दार्थ चव्हाण (वय ३७, कोरेगाव, जि.सातारा, हल्ली रा. भाळवणी) असे मृत तरुणाचे नाव आहे. त्याच्या खिशात आढळलेल्या डायरीवर बहिण व मेव्हण्याचा मोबाईल नंबर मिळाला. त्यांच्याशी पारनेर पोलिसांनी संपर्क केला आहे. सुरेशच्या आईवडीलांचेही निधन झालेले आहे.

सुरेश गेल्या सहा महिन्यांपासून भाळवणीतील एका भेळ सेंटरमध्ये वेटरचे काम करत होता. हॉटेल मालकाच्या खोल्यांमध्ये आपल्या मित्रांसमवेत तो राहात होता. दोघे मित्र दररोज नागेश्वर मंदिराजवळ असणाऱ्या केटीवेअर आंघोळीसाठी दररोज जात होते. शुक्रवारी सकाळी सुरेश चव्हाण पोहण्यासाठी गेला असता पाण्याचा प्रवाह वाढल्याने तो वाहून गेला. १ तासानंतर स्मशानभूमी परिसरातील केटीवेअरजवळ त्याचा मृतदहे आढळून आला. पारनेर पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असल्याची माहिती सहाय्यक फौजदार राजेंद्र डोंगरे यांनी दिली. पुढील अधिक तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पारनेर पोलिस करीत आहेत.

रेणुका माता देवस्थानात नवरात्रोत्सवाची तयारी पूर्ण

शेवगाव (तालुका प्रतिनिधी) – श्रीक्षेत्र अमरापुर येथील श्री रेणुका माता देवस्थानात शारदीय नवरात्रोत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. रेणुका मातेच्या मुख्य मंदिरासह सर्व मंदिरे, भक्त निवास व परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

डॉ. प्रशांत भालेराव तसेच पाथर्डीचे प्रथम नगराध्यक्ष सुभाष घोडके व माजी नगराध्यक्ष जनाबाई घोडके तसेच प्रा. जनार्दन लांडे पाटील व विजयाताई लांडे पाटील या दाम्पत्याच्या हस्ते ज्योतीची विधीवत पूजा व श्री रेणुका मातेची आरती करून पायी ज्योत आणण्यासाठी जाणाऱ्या भाविकांना बुधवारी माहूरगडाकडे रवाना करण्यात आले.

माहूर येथील श्री रेणुका माता मंदिरात अभिषेक व आरती करून ज्योतीची पूजा केली. देवस्थानातील अमित भोपे, शुभम भोपे यांनी पौरोहित्य करून तेथील अखंड तेवत असलेल्या नंदादीपमधून ज्योत पेटवून दिली. ती ज्योत घेऊन भाविक श्री क्षेत्र अमरापूरला पायी निघाले आहेत. जय जगदंब, जय जगदंबफच्या घोषणांसह पायी ज्योत घेऊन निघालेले भाविक चारशे किलोमीटरचा प्रवास करून रविवारी दुपारपर्यंत अमरापूर देवस्थानात पोहोचणार आहेत.

नवरात्रोत्सव काळात प्रशांत भालेराव मंदिरात थांबून असतात. श्री रेणुका परिवारातील पांडुरंग देवकर, श्रीमंत घुले, राजेंद्र नांगरे, अश्वलिंग जगनाडे, प्रा. जनार्दन लांडे पाटील, गणेश गाडे, ॲड. तनपुरे, कृष्णा महाराज मुळीक, गजानन वाघ, रविंद्र आढाव, सचिन जाखडे, देव झरेकर, सुरेश गाडे, अनिकेत गायकवाड, ऋतिक देशपांडे, गंप्पु गाड़े, बारकु बच्छाव, अमरनाथ साळवे, संभाजी पंडित, अण्णासाहेब राजळे आणि इतर ३० भाविक पायी ज्योत घेऊन येत आहेत. साडेतीन शक्तीपीठांपैकी एक पीठ असलेल्या श्रीक्षेत्र माहूरच्या श्री रेणुका देवींचे श्रीक्षेत्र अमरापूर हे ठाणे असून, नवसाला पावणाऱ्या आणि भक्ताच्या हाकेला धावून येणाऱ्या श्री रेणुका मातेचे स्थान म्हणून गेल्या एकोणवीस वर्षांपासून प्रसिद्ध आहे. नवरात्रोत्सवात दर्शनासाठी गर्दी होते.

वृद्ध महिलेच्या घरातून ९ तोळ्यांचे दागिने लंपास; नगरच्या सिव्हिल हाडको परिसरातील घटना

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– सिव्हिल हाडको परिसरात वृद्ध महिलेच्या घरात चोरट्याने घरफोडी करून तब्बल ९ तोळ्याचे सोन्याचे दागिने चोरल्याची घटना उघड झाली आहे. हा प्रकार १८ सप्टेंबर रोजी दुपारी उघडकीस आला. सुशिला परशुराम राऊत (वय ७०, रा. निसार हॉस्पिटल मागे, सिव्हिल हाडको, नगर) या कुटुंबासह राहत असून त्यांचे सुशिला लॉन्ड्री नावाचे इस्त्री दुकान आहे. त्यावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. १८ सप्टेंबर रोजी सकाळी अकराच्या सुमारास सुशिला राऊत व त्यांची मुलगी वंदना या नातेवाईकाच्या अंत्यविधीसाठी अमरधाम, नालेगाव येथे गेल्या होत्या. घरात त्यावेळी त्यांचे पती परशुराम हे एकटेच होते. दुपारी दीडच्या सुमारास दोघी घरी परत आल्या असता बेडरूममधील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले. कपाट उघडे होते आणि त्यामध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने गायब असल्याचे लक्षात आले.त्यांनी सर्वत्र शोध घेतला मात्र दागिने मिळाले नाहीत. त्यानंतर खात्री झाली की, अज्ञात चोरट्याने त्यांच्या अनुपस्थितीत घरात प्रवेश करून दागिने चोरून नेले आहेत. चोरीस गेलेल्या मुद्देमालात दोन गंठण (६ तोळे), दोन अंगठ्या (१० ग्रॅम), एक चैन (१ तोळा), ओम पेंडल (२ ग्रॅम), कानातील झुबे (५ ग्रॅम) आणि सोन्याची फुले (३ ग्रॅम) असा ९ तोळ्याचा ऐवज चोरीला गेला आहे. या प्रकरणी राऊत यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी अज्ञात इसमाविरोधात गुन्हा नोंदवला आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर संसदेत आवाज उठवला

खा. लंके : पारनेर बाजार समितीची सर्वसाधारण सभा

पारनेर (तालुका प्रतिनिधी)– कांद्याच्या भाव वाढीसह, निर्यातीस परवानगीसाठी, दूधाच्या हमी भावासाठी, भेसळ रोखण्यासाठी आंदोलन केले. संसदेमध्ये दुधाच्या किटल्या नेवून दिल्या जात नव्हत्या. मोठी सुरक्षा असूनही आम्ही त्या घेऊन गेलो. जनतेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवला पाहिजे असे सांगत खा. लंके यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर वारंवार संसदेत आवाज उठवत असल्याचे खा. नीलेश लंके यांनी सांगितले.

पारनेर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत खा. लंके बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, सभापती किसनराव रासकर, बाबाजी तरटे, सुदाम पवार, अशोक कटारिया, मारूती रेपाळे, सुवर्णा धाडगे, पुनम मुंगसे, गंगाराम बेलकर, बापूसाहेब शिर्के, डॉ. आबासाहेब खोडदे, विजय पवार, डॉ. पद्मजा पठारे, तुकाराम चव्हाण, राजू शेख, नंदकुमार देशमुख, किसन गंधाडे, ॲड. राहुल झावरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. खा. लंके म्हणाले,१९८१ मध्ये बाजार समिती सुरू झाली. विविध आमदारांनी या समितीला सहकार्य करण्याची भूमिका घेतली. बाजार समितीची सत्ता हाती आल्यानंतर शेतकऱ्यांनी टाकलेल्या विश्वासाला आपण सार्थ होऊ की नाही हा प्रश्न होता, मात्र, संचालक मंडळाने हा विश्वास सार्थ ठरवला. पूर्वी बाजार समितीचा नफा २७ लाख होता. मात्र पहिल्या वर्षी १ कोटी ३२ लाख तर दुसऱ्यावर्षी २ कोटी १७ लाखांचा नफा आहे. तसेच ३ कोटींच्यावर ठेवी असून त्यातून २५ लाख रूपये व्याज मिळते असा या संचालक मंडळाचा कारभार पारदर्शी असल्याचे खा. लंके म्हणाले.

आदर्श व्यक्तिमत्व म्हणून जयंत पाटील यांच्याकडे पाहिले जाते. हल्ली राजकारणात सुसंस्कृतपणा राहिलेला नाही. राज्याच्या सरकारमधील जे जबाबदार राज्यामध्ये फिरतात. त्यांना समाजात चिथावणी देण्यासाठी पाठवलेले असते. ते वेगवेगळया नेते मंडळींवर खालच्या पातळीवर बोलतात. जयंत पाटील यांच्यावर मध्यंतरीच्या काळात सुप्रिया सुळे, शरद पवार यांच्या विरोधात वक्तव्ये करण्यात आली. वेगवेगळया मार्गाने वातावरण दुषीत केले जात आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाचा सुसंस्कृतपणा घालवण्यात येत असून त्याचा फटका बसल्याशिवाय राहणार नाही, असे खा. लंके यावेळी म्हणाले. महाराष्ट्राची बिहारच्या दिशेने वाटचाल सुरू असून चुकीच्या वक्तव्याचा निषेध केलाच पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

कुख्यात घायाळ टोळीच्या चास घाटाजवळ आवळल्या मुसक्या

एलसीबीची कामगिरी; घातक शस्त्रांसह ७.९० लाखांचा मुद्देमाल जप्त

अहिल्यानगर (प्रतिनिधी)– कुख्यात गुंड गौरव घायाळ व त्याच्या चार साथीदारांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चास घाटाजवळ दरोड्याच्या तयारीत असताना सापळा रचून अटक केली. या कारवाईतून पोलिसांनी तब्बल ७ लाख ९० हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून संशयित आरोपींविरुद्ध दरोडा तयारीचा गुन्हा नगर तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेकडून दरोडा व मालाविरुद्धच्या गुन्ह्यांवर अंकुश ठेवण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत पोलीस निरीक्षक किरण कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक हरीष भोये, उपनिरीक्षक अनंत सालगुडे, तसेच अंमलदार लक्ष्मण खोकले, हृदय घोडके, सुरेश माळी, अतुल लोटके, भिमराज खर्से, बाळासाहेब नागरगोजे, रिचर्ड गायकवाड, राहुल डोखे, सोमनाथ झांबरे, भगवान थोरात, विशाल तनपुरे, योगेश कर्डिले, भगवान धुळे, महादेव भांड यांचे पथक सहभागी आहे. शनिवार, २० सप्टेंबर रोजी मध्यरात्री पथक नगर तालुका हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहितीच्या आधारे चास घाटाजवळ छापा टाकण्यात आला. काळ्या रंगाची इनोव्हा कार अंधारात उभी करून संशयित दरोड्याची तयारी करत असल्याचे पोलिसांना दिसले. पथकाने तत्काळ शिताफीने हालचाल करून संशयितांना ताब्यात घेतले. त्यामध्ये गौरव घायाळ (२४, रा. सुपा, ता. पारनेर), सतिष पावडे (३५, रा. दरोडी, ता. पारनेर, हल्ली सुपा), अनिकेत साळवे (२९, रा. सुपा), विशाल जाधव (२३, रा. सुपा), गोविंद गाडे (३६, रा. सुपा) यांचा समावेश आहे. संशयितांची पंचासमक्ष झडती घेतली असता, १ पिस्तुल व १ जिवंत काडतूस, १ तलवार, १ गिलव्हर, १ बेसबॉलचा दांडका, ६ मोबाईल, इनोव्हा कार असा एकूण ७ लाख ९० हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

गौरव घायाळचा गुन्हेगारी इतिहास

▸ मुख्य आरोपी गौरव हरीभाऊ घायाळ हा पारनेर तालुक्यातील कुख्यात गुंड असून त्याच्याविरुद्ध यापूर्वी पारनेर, सुपा, एमआयडीसी व विविध पोलीस ठाण्यांत तब्बल ९ गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यात हाणामारी, सरकारी कामात अडथळा आदी गुन्ह्यांचा समावेश आहे.